## सरकार पक्षातर्फे साक्षीदार क्र. १.

## मी शपथेवर कथन करतो की,

**नाव** – दशरथ दत्तु खैरे.

**वय** – ७५ वर्ष, **व्यवसाय** - शेती,

**राहणार –** आंबाडे, ता. आजरा, जि. कोल्हापूर.

### सरतपास– श्रीमती. एस. एस. पाटील, सरकारी वकील.

१. फिर्यादी माझी पत्नी असून आम्हाला दोन मुले आहेत. मी सैन दलातून सेवानिवृत झालो आहे. मला शासनाकडून आंबाडे, ता. आजरा येथे गट क्र. ९६/७ मध्ये जमीन मिळालेली आहे. माझ्या घराशेजारी आरोपींचे घर आहे. आमचा व आरोपींचा रस्त्याच्या कारणावरून वाद आहे.

२. दि. ५.१.२०२४ रोजी रात्री ८.३० वा. दरम्यान आरोपी क्र. १ ने आमच्या घराशेजारी येवून आम्हाला वाईट वंगाळ शिवीगाळ केली होती. ती आमच्या रस्त्यावरून तुम्ही, जनावरे जायचे नाही, पाय टाकायचा नाही अशी धमकी देत होती. त्यामुळे माझी पत्नी तिला विचारायला गेली असता, आरोपी क्र. १ ने तिच्या डाव्या मांडीवर आणि हातावर लाकडी टोण्याने मारहाण केली होती. त्यावेळी माझ्या पत्नीला आरोपी क्र. २ तुळसाबाईने धक्काबुक्की केली होती.

३. त्यावेळी आरोपी क्र. ३ व ४ यांनी मला पकडून धक्का बुक्की केली होती. त्यांनतर त्यांनी आम्हाला रस्त्याने जनावरे, शेळया घेवून गेल्यास जीवे मारण्याची धमकी दिली. त्यांनतर आम्ही पोलीसांकडे तक्रार दयायला गेलो होतो. माझ्या पत्नीने आरोपीविरोधात तक्रार दिली होती. मी माझ्या पत्नीला आरोपी क्र. १ ने मारहाण केलेला लाकडी टोणा दाखवल्यास ओळखू शकतो. आता मला तो लाकडी टोणा दाखवला. तो तोच असून मी ओळखतो. त्याला वस्तू क्र. अ देण्यात येतो. आरोपी आज न्यायालयात हजर आहेत.

**सरतपास पुर्ण.**

### उलटतपास – श्री. के. जी. पाटील, वकील.

४. मी माझ्या गट क्र. ९६/७ च्या जमीनीचा ७/१२ उतारा पोलीसांना दिला

नव्हता. माझ्या जमीनी शेजारी आरोपींची जमीन असून त्यामध्ये त्यांचे घर आहे. माझे घर गट क्र. ९६/७ च्या मिळकतीत आहे. आमच्या व आरोपींच्या घरामध्ये ३०० मीटरचे अंतर आहे. मला मिळालेल्या शेतजमीनीतून सरकारी रस्ता नाही. आरोपींच्या ताब्यातील शेतातून सरकारी रस्ता नाही.

**५**. तेजस कुराडे हा आमचा शेजारी आहे. हे म्हणणे खरे नाही की, आमचा, तेजस आणि आरोपींचा पिण्याच्या पाण्याची पाईपलाईन फोडण्यावरून कायम वाद होत असतो. मला तेजसने आरोपीं विरोधात केलेल्या ऑनलाईन तक्रारीची माहिती दिलेली नाही. गट क्र. ९६/७ व ९५/१ यांच्या हद्दी लागून लागून आहेत. हे म्हणणे खरे नाही की, आमची जनावरे गट क्र. ९५/१ च्या मिळकतीत कायम चरण्यासाठी जात असतात.

**६**. आमच्या व आरोपींच्या घरा दरम्यान डांबरी अथवा खडीचा रस्ता नाही. घटनेच्या दिवशी सायंकाळी ५.०० वा. दरम्यान आमच्या शेळीची करडे गट क्र. ९५/१ च्या मिळकतीत गेली होती. त्यावेळी मी व माझी पत्नी घरी नव्हतो. आम्ही त्यावेळी गवत बांधणेसाठी गेलो होतो. आम्ही ५.३० वा. दरम्यान घरी आलो होतो. आम्ही घरी आल्याआल्या आरोपींने आम्हाला शिवीगाळी केली नव्हती. माझ्या सांगण्याप्रमाणे घटना ८.०० ते ८.३० वा. दरम्यान घडली होती. माझी पत्नी घटनेनंतर रात्री तेजस कुराडे सोबत पोलीस ठाण्यात तक्रार दयायला गेली होती. त्यावेळी मी तिच्या सोबत गेलेलो नव्हतो. त्या रात्री माझी पत्नी १०.०० ते ११.०० वा. दरम्यान घरी आली होती.

**७.** मी तिच्याकडे घरी आल्यावर तक्रार घेतली किंवा नाही याबाबत चौकशी केली होती. त्यावेळी तीने मला तक्रार नोंदली नसून पोलीसांनी १०० कॉट गडहिंग्लज येथील रुग्णालयातून उपचार घेवून यायला कळविल्याचे सांगितले होते. दिवशी तक्रार दाखल होवू शकली नसल्याने तिला दुस–या दिवशी बोलावले होते. त्यामुळे मी व मुलगा शरद तिच्यासोबत पोलीस ठाण्यात गेलो होतो. आम्ही सकाळी ८.०० ते ९.०० वा. दरम्यान पोलीस ठाण्यात पोहोचलो होतो.

८. पोलीसांनी त्या दिवशी रात्री १०.०० ते ११.०० वा. माझ्या पत्नीचा जबाब लिहून घेतला होता. हे म्हणणे खरे नाही की, मी आमचा व आरोपींचा रस्त्याबाबत वाद असल्याचे खोटे सांगत आहे. घटनेच्या वेळी सर्व आरोपी त्यांच्या ताब्यातील शेतात पालापाचोळा पेटवून त्याच्या शेजारी बसले होते. ते अंतर आमच्या घरापासून १०० ते १२५ फुट अंतरावरती होते. ते सर्व तेथे बसून आम्हाला शिवीगाळी करत होते. आम्ही त्यावेळी त्यांना शिवीगाळी का करता याबाबत विचारले होते.

९. घटनेच्या वेळी अंधार पडलेला होता परंतू आरोपींनी जाळलेल्या पाला पाचोळयामुळे आसपासचे सर्व दिसत होते. आरोपींनी पालापाचोळा जाळलेल्या ठिकाणी रस्त्यावर आमची भांडणे झाली होती. आम्ही आरोपींकडे विचारणा करण्यासाठी गेल्यानंतर आमचा वाद झाला होता. मी पोलीसांना जबाब देताना आरोपी पाला पाचोळा जाळत बसलेल्या ठिकाणावरून एकत्र बसून आम्हाला शिवीगाळी करत असल्याची बाब पोलीसांनी सांगितली नव्हती.

**१०**. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी क्र. १ ने माझ्या पत्नीला लाकडी टोण्याने हातवर व पायावर मारहाण केली नसून आरोपी क्र. २ ने तिला धक्काबुक्की केलेली नाही. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी क्र. ३ व ४ यानी मला धक्काबुक्की करून रस्त्याने गेल्यावर जीवे मारण्याची धमकी दिलेली नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी सरतपासात सांगितल्याप्रमाणे कोणतीही घटना घडलेली नाही. हे म्हणणे खरे नाही की,पोलीसांनी दुस–या दिवशी माझ्या पत्नी रात्री १०.०० ते ११.०० वा जबाब घेतल्याचे खोटे सांगत आहे.

**उलट तपास पुर्ण.**

**फेरतपास नाही.**

**श्रवणोत्तर स्वीकृती,**

Digitally signed by RAVI PANDURANG THORE

दिनांक – १४.११.२०२५. (आर. पी. थोरे)

आजरा. प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, आजरा.